

देगलूर : राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी लेंडी नदीची स्वच्छता केली.

# राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी केली लेंडी नदीची स्वच्छता

देगलूर, ता.१० (बातमीदार) : देगलूर महाविद्यालय, देगलूर व ५२ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय छात्र सेना विभागातील विद्यार्थ्यांच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त जलकुंभ स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. लेंडी नदीच्या किनारी असलेली अस्वच्छता बघून छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला. या वेळी प्राचार्य डॉ. मोहन खताळ, उप प्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार व एनसीसीचे विभागप्रमुख डॉ. निरजकुमार, महाराष्ट्र बटालियनचे कर्नल एम. रंगाराव यांनी विद्यार्थ्यांना स्वच्छते विषयी महत्व सांगून ही मोहीम यशस्वी करण्याचे आवाहन केले.

या वेळी एनसीसीचे सिनिअर प्रसाद कोंकेवार, अक्यमवार साईराम यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचे अड्त व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री प्रकाश पाटील बेंबरेकर, संस्थेचे सचिव शशिकांत चिद्रावार, उपाध्यक्ष नारायणराव मैलागीरे, सहसचिव सूर्यकांत नारलावार, कोषाध्यक्ष विलास तोटावार व कार्यकारिणी मंडळ सदस्य राजकुमार महाजन, डॉ. कर्मवीर उंग्रतवार, देवेंन्द्र मोतेवार, गंगाधर जोशी, जनार्दन चिद्रावार, रवींद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, डॉ. अनिल चिद्रावार, निवृती गोविंदवार, कत्तुरवार, पर्यवेक्षक प्रा. संग्राम पाटील, कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी यांनी आभिनंदन केले आहे.